ePaper
पहिल्या बुलेट ट्रेनचा फोटो समोर; प्रवास होणार वेगवान!

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™





पान 3 वरुन...

पिंपरीत बोगदे धोकादायक; अपघाताचा वाढता धोका

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 19 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दौरा यशस्वी; व्यापार आणि AI सहकार्यावर महत्त्वाची चर्चा

# पंतप्रधान मोदींना स्वीडनचा सर्वोच्च सन्मान

महाईन्यूज । नवी दिल्ली

**नेदरलँड्सचा दौरा यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी स्वीडनमध्ये दाखल झाले. स्वीडनमध्ये पोहोचताच त्यांना 'रॉयल ऑर्डर ऑफ पोलर स्टार' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले. परदेशी नेत्यांना दिला जाणारा हा स्वीडनचा सर्वोच्च सन्मान असून, मोदींना मिळालेला हा 31 वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार ठरला आहे.**



स्वीडनमध्ये मोदींचे राजेशाही थाटात स्वागत करण्यात आले. त्यांच्या विमानाने स्वीडनच्या हवाई क्षेत्रात प्रवेश करताच स्वीडिश वायूसेनेच्या लढाऊ विमानांनी विशेष सुरक्षा दिली. गोथेनबर्ग विमानतळावर स्वीडनचे पंतप्रधान उल्फ क्रिस्टर्सन यांनी स्वतः उपस्थित राहून त्यांचे स्वागत केले. त्यानंतर मोदींनी भारतीय समुदायाशी संवाद साधला. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले.

दरम्यान, मोदी आणि क्रिस्टर्सन यांच्यात उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत व्यापार, तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. 2025 मध्ये 7.75 अब्ज डॉलरवर पोहोचलेल्या द्विपक्षीय व्यापाराला आणखी गती देण्याचा निर्धार दोन्ही देशांनी व्यक्त केला.

तसेच स्वच्छ ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप्स, पुरवठा साखळी आणि अंतराळ संशोधन या क्षेत्रांमध्ये संयुक्तपणे काम करण्यावर सहमती झाली. या दौऱ्यामुळे भारत आणि नॉर्डिक देशांमधील संबंधांना नवी दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

### मोदींना 'पोलर स्टार' सन्मान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्वीडन सरकारतर्फे 'रॉयल ऑर्डर ऑफ पोलर स्टार' हा प्रतिष्ठेचा आणि सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. परदेशी नेत्यांना दिला जाणारा हा अत्यंत मानाचा पुरस्कार असून, मोदींना मिळालेला हा 31 वा आंतरराष्ट्रीय बहुमान ठरला आहे. या सन्मानामुळे भारताची जागतिक स्तरावर वाढती प्रतिष्ठा आणि प्रभाव पुन्हा अधोरेखित झाल्याचे मानले जात आहे.

याशिवाय, मोदी युरोपियन उद्योग क्षेत्रातील प्रमुख संघटना EUROPEAN ROUND TABLE FOR INDUSTRY यांच्यासोबतही संवाद साधणार आहेत. या बैठकीत युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयेन उपस्थित राहणार आहेत. ग्रीन हायड्रोजन आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात भारतात मोठ्या गुंतवणुकीवर विशेष भर दिला जाणार आहे.

दरम्यान, 1748 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'रॉयल ऑर्डर ऑफ पोलर स्टार' या सन्मानाने सार्वजनिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य आणि आंतरराष्ट्रीय योगदानाची दखल घेतली जाते. स्वीडनच्या क्राऊन प्रिन्सेस व्हिक्टोरिया यांनी विशेष समारंभात मोदींना हा पुरस्कार प्रदान केला.

### कोणत्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली?

याशिवाय या बैठकीत स्वच्छ ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमता, स्टार्टअप्स, मजबूत पुरवठा साखळी आणि अंतराळ संशोधन यांसारख्या भारताच्या सुरक्षित भविष्यासाठी महत्त्वाच्य असणाऱ्या, अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये एकत्र काम करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दाखवली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या या दौऱ्यामुळे भारत आणि नॉर्डिक देशांमधील संबंधांना एक नवी आणि गतीमान दिशा मिळाली आहे.



### जागतिक गुंतवणुकी-बाबतही चर्चा करणार

तसेच स्वीडनच्या पंतप्रधानांसोबत बैठकीव्यतिरिक्त, मोदी आज युरोपमधील युरोपियन राऊंड टेबल फॉर इंडस्ट्री या सर्वात मोठ्या बिझनेस लीडर्सच्या फोरमशी जागतिक गुंतवणुकीबाबत संवाद साधणार आहेत. विशेष म्हणजे, या बैठकीत युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयेन देखील उपस्थित राहणार आहेत. 2026 च्या जानेवारी महिन्यात भारत-युरोपियन यूनियन दरम्यान झालेल्या फ्री ट्रेड एग्रीमेंट नंतरची ही पहिलीच सर्वात मोठी बैठक आहे.

# नीट पेपरफुटीतील मनीषा मांढरे निलंबित

## मॉडर्न महाविद्यालय, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडून कारवाई

**महाईन्यूज। पुणे**

**नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने अटक केलेल्या मनीषा मांढरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने मांढरे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.**



महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी या बाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. मनीषा मांढरे या पुण्यातील शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात शिक्षिका म्हणून सन २००२ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. गेली २४ वर्षे अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांचा अध्यापनातील अनुभव लक्षात घेऊन नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) NEET परीक्षेसंदर्भातील काही गोपनीय कामकाजासाठी त्यांची नियुक्ती केली होती. या नियुक्तीबाबत संस्था आणि मॉडर्न महाविद्यालयाचा दूरान्वये संबंध नाही. त्यांचे कार्य पूर्णतः गोपनीय स्वरूपाचे असून, संबंधित व्यक्ती आणि एनटीए यांच्यातील पत्रव्यवहार, सूचना थेट मनीषा मांढरे यांना देण्यात येत होत्या. त्यामुळे या प्रक्रियेशी महाविद्यालय प्रशासन अथवा संस्थेचा दूरान्वये संबंध नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

मनीषा मांढरे यांना नीट २०२६ प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात अटक झाल्याची माहिती वृत्तवाहिन्या, प्रसारमाध्यमांद्वारे समोर आली. ही बाब अत्यंत गंभीर, दुर्दैवी आणि निंदनीय आहे. अशा प्रकारच्या घटना शिक्षण क्षेत्राच्या प्रतिमेला बाधा पोहोचवणाऱ्या आहेत. या प्रकाराची संस्था व महाविद्यालय स्तरावर गांभीर्याने दखल घेऊन मनीषा मांढरे यांच्या संदर्भात सोमवारी (१८ मे) संस्थेच्या नियामक मंडळाची तातडीची बैठक झाली. या बैठकीत मांढरे यांच्या महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ (एमईपीएस) कायद्यातील ३३ (५) या नियमानुसार निलंबनाची कारवाई करून त्यांना अटक झालेल्या दिनांकापासून (शनिवार, १६ मेपासून) महाविद्यालयाच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. मांढरे यांच्या निलंबनाबाबत शिक्षण आयुक्त, पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक, शालेय शिक्षण विभागाचे सहसंचालक कळवण्यात आले आहे. या बाबत पुढील चौकशी सीबीआयच्या सहकार्याने करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

### सीबीआयला सहकार्य करणार

शिक्षिका मनीषा मांढरे यांच्या निलंबनाबाबतचे अधिकृत पत्र शिक्षण आयुक्त (पुणे), शालेय शिक्षण विभागाचे उपसंचालक आणि सहसंचालक यांना पाठवण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची पुढील चौकशी केंद्रीय अन्वेषण ब्यूरोच्या पूर्ण सहकार्याने केली जाईल आणि चौकशीत संस्था सर्वतोपरी मदत करेल, अशी ग्वाही संस्थेच्या वतीने प्रा. शामकांत देशमुख (कार्यवाह), प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे (सहकार्यवाह) आणि प्राचार्या प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांनी दिली आहे. या धक्कादायक कारवाईमुळे पुणे आणि राज्यातील शैक्षणिक वर्तुळात मात्र एकच खळबळ उडाली आहे.

---

# विमान निर्मितीच्या जागतिक नकाशावर पुणे! जीई एरोस्पेसकडून गुंतवणुकीची घोषणा

**महाईन्यूज। पुणे**

**विमान निर्मिती क्षेत्राच्या जागतिक नकाशावर पुण्याचे स्थान आता बळकट होणार आहे. जीई एरोस्पेस कंपनीने पुण्यातील उत्पादन प्रकल्पात १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. यामुळे कंपनीच्या भारतातील उत्पादन क्षमतेचा विस्तार होणार आहे. ही गुंतवणूक वेल्डिंगचे नवीन तंत्रज्ञान, प्रगत तपासणी उपकरणे, अचूक साधने आणि अतिरिक्त पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी वापरली जाईल.**



जीई एरोस्पेस कंपनीने पुण्यातील उत्पादन प्रकल्पातील एकूण गुंतवणूक ५१० कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. याआधीची गुंतवणूक प्रामुख्याने उत्पादन प्रक्रिया प्रगत करणे, स्वयंचलित यंत्रणा आणि पुढील पिढीतील विमान इंजिनांच्या सुट्या भागांची क्षमता वाढवण्यावर केंद्रित होती. नव्या सुधारणांमुळे या सुविधेच्या क्षमतांचा अधिक विस्तार होईल. जीई एरोस्पेसच्या जीई९०, जीईएनएक्स, जीई९एक्स आणि सीएफएम इंटरनॅशनलच्या लीप इंजिनसाठी लागणाऱ्या सुट्या भागांच्या उत्पादनास पाठबळ मिळेल.

याबाबत जीई एरोस्पेसच्या पुणे प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजित सिंग म्हणाले की, या सातत्यपूर्ण गुंतवणुकीमधून जीई एरोस्पेसची भारताप्रती असलेली दीर्घकालीन कटिबद्धता दिसून येते. आमच्या जागतिक उत्पादन साखळीत पुणे प्रकल्प महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. पुण्यातील प्रकल्पाच्या विस्तारामुळे रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होत आहेत. गेल्या दशकभरात हा प्रकल्प उच्च-क्षमतेच्या विमान इंजिनांच्या सुट्या भागांचे केंद्र म्हणून विकसित झाला आहे. यामुळे स्थानिक पुरवठादारांची परिसंस्था निर्माण झाली असून, ती जीई एरोस्पेसच्या जागतिक पुरवठा साखळीत मोलाचे योगदान देत आहे.

### महत्वपूर्ण सुट्या भागांची निर्मिती

जीई एरोस्पेसचा पुण्यातील प्रकल्प कंपनीच्या जागतिक पुरवठा साखळीचा महत्त्वाचा भाग आहे. या प्रकल्पात व्यावसायिक विमान इंजिनांसाठी लागणारे महत्त्वपूर्ण सुटे भाग तयार केले जातात. हा प्रकल्प भारतातील २,२०० हून अधिक जीई एरोस्पेस पुरवठादारांच्या व्यापक जाळ्याशी जोडला असून, ३०० हून अधिक स्थानिक पुरवठादारांसोबत काम करतो. प्रगत उत्पादन कौशल्य आणि अचूक अभियांत्रिकी क्षमतांच्या माध्यमातून जागतिक एरोस्पेस प्रोग्राममध्ये भारताची भूमिका प्रबळ करण्यास यामुळे मदत होत आहे.

### कौशल्य प्रशिक्षणावर भर

हा प्रकल्प कर्मचाऱ्यांच्या विकासामध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. येथील दोन वर्षांच्या संरचित अ‍ॅप्रेन्टिसशिप प्रोग्रामांतर्गत दरवर्षी ५०० हून अधिक प्रशिक्षणार्थींना वर्गातील शिक्षण आणि प्रकल्पातील वेल्ड स्कूलद्वारे विशेष टीआयजी वेल्डिंग प्रशिक्षण दिले जाते. २०१५ पासून, या प्रकल्पाने ५ हजारांहून अधिक उत्पादन सहकाऱ्यांना प्रशिक्षित केले आहे. त्यामुळे भारतात एरोस्पेस उत्पादन क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत झाली आहे.

# पिंपरीत बोगदे धोकादायक; अपघाताचा वाढता धोका

## खड्डे, अंधार व तुटलेल्या काँक्रीटमुळे नागरिकांमध्ये भीती; तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी उभारण्यात आलेले बोगदे, समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) आणि अंडरपास सध्या धोकादायक अवस्थेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. विविध ठिकाणी पाहणीदरम्यान बंद पडलेले विद्युत दिवे, भिंतींना पडलेले तडे, खोल खड्डे, तुटलेले काँक्रीट, लटकणाऱ्या लोखंडी सळया, फाटलेले जाहिरात फलक आणि घसरडे झालेले रस्ते आढळून आले. काही बोगद्यांमध्ये तीव्र वळणे असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.**



अनेक समतल विलगकांच्या भिंतींना मोठे तडे गेले असून, काही ठिकाणी उंच वाहनांच्या धडकेमुळे छताचे काँक्रीट तुटून लोखंडी सळया बाहेर आल्या आहेत. हे तुकडे धोकादायक अवस्थेत लटकत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



शहराच्या सौंदर्यीकरणासाठी आणि वाहतूक व्यवस्थेसाठी कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या संरचनांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. काही बोगद्यांमध्ये उद्यानातील पाणी थेट रस्त्यावर येत असल्याने मार्ग चिखलमय व घसरडे झाले आहेत. परिणामी दुचाकी घसरण्याच्या घटना वाढल्या आहेत.

### अंधारात जीव धोक्यात

अनेक बोगद्यांतील विद्युत दिवे बंद असल्याने अचानक अंधारात प्रवेश करताना चालकांचा अंदाज चुकतो. विशेषतः दुचाकीस्वारांना काही क्षण रस्ता दिसेनासा होतो. त्यातच वळणांमुळे समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज लागत नाही.

### प्रशासनाचे म्हणणे

“विभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून, ज्या ठिकाणी दिवे नाहीत तेथे तात्काळ दुरुस्ती सुरू आहे. वायर चोरीच्या घटना घडत असल्याने पोलिसांत तक्रार नोंदवली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नियमित देखभाल केली जात आहे,” असे सह शहर अभियंता माणिक चव्हाण यांनी सांगितले.

“शहरातील सर्व बोगदे व समतल विलगकांचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले असून, 20 वर्षांहून अधिक जुन्या फ्लायओव्हर व ब्रिजचा अहवाल लवकरच येणार आहे. त्यानुसार 15 जूनपर्यंत आवश्यक कामे पूर्ण केली जातील,” अशी माहिती उप अभियंता विजय भोजणे यांनी दिली.

### उपाययोजना

- सर्व बोगदे व समतल विलगकांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट
- बंद पडलेले दिवे त्वरित सुरू करणे
- खड्डे बुजवणे व रस्ते स्वच्छ करणे
- ड्रेनेज व्यवस्था सुधारणा
- तुटलेले काँक्रीट व लोखंडी भाग हटवणे
- हाइट गेज व सेन्सर यंत्रणा बसवणे
- रिफ्लेक्टर, कॅट आय व चेतावणी फलक बसवणे
- सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे
- हेल्पलाइन व तक्रार निवारण प्रणाली सुरू करणे

# पिंपरी महापालिका कार्यालयांत दाखल्यांसाठी नागरिकांचे हाल

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नागरिकांना अगदी साध्या दाखल्यांसाठीही अक्षरशः हेलपाटे मारावे लागत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. डोमिसाईल, उत्पन्न दाखला, प्रतिज्ञापत्र यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.**

अनेक ठिकाणी बसण्यासाठी बाकडे नाहीत, तर पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था नसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे.

एका बाजूला प्रशासन डिजिटल सेवा उपलब्ध असल्याचा दावा करत असताना दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात सर्व्हर डाऊनच्या समस्येमुळे कामकाज वारंवार ठप्प होत असल्याचे चित्र आहे. दिवसभर रांगेत उभे राहूनही सर्व्हर बंद असल्यामुळे अनेकांना काम न होता परत जावे लागत आहे. वीज गेल्यानंतर जनरेटरचीही व्यवस्था नसल्याने नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

डोमिसाईल आणि उत्पन्न दाखल्यांसाठी दिवसाला केवळ 60 फॉर्म स्वीकारले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे लांबून आलेल्या नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागते. या मर्यादेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



कार्यालय परिसरात एजंटांचा सुळसुळाट झाल्याच्या तक्रारी वाढत आहेत. सामान्य नागरिकांना अनेक दिवस हेलपाटे मारावे लागत असताना एजंट मात्र थेट अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये जाऊन कामे लवकर करून घेत असल्याचे आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

प्रतिज्ञापत्रासाठी अधिकृत शुल्क 69 रुपये असतानाही काही ठिकाणी 100 रुपये आकारले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही व्यवहारांसाठी वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर ऑनलाइन पेमेंट घेतले जात असल्याने व्यवहाराची पारदर्शकता संशयात आली आहे. अप्पर तहसील आणि क्षेत्रीय कार्यालये एकाच इमारतीत असल्याने परिसरात पार्किंगची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अधिकाऱ्यांच्या वाहनांमुळे नागरिकांना वाहन लावण्यासाठी जागा मिळत नाही. भरदिवसा पार्किंगमधील दिवे सुरू असल्याने ऊर्जा बचतीच्या घोषणांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांनी तक्रारी केल्यानंतरही वरिष्ठांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले जाते. “घाई असेल तर ऑनलाइन काम करा, ई-सेवा केंद्रात जा, येथे येऊ नका,” अशी उत्तरे दिली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

दरम्यान, प्रशासनाने वर्षभरात एक लाखाहून अधिक दाखले वितरित केल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींमुळे संतापाची भावना वाढत आहे. नागरिकांनी प्रशासनाने तातडीने सुविधा सुधाराव्यात, सर्व्हरची समस्या सोडवावी आणि एजंटराजावर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी केली आहे.

### नागरिकांची फरफट, प्रशासन झोपेत!

महापालिका कार्यालयांत साध्या दाखल्यांसाठीही नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून सर्व्हर डाऊन, एजंटराज आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे त्रास वाढला आहे. ज्येष्ठ नागरिकांची विशेष गैरसोय होत असताना अधिकृत शुल्कापेक्षा जास्त पैसे घेतल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. पार्किंगचा गोंधळ, मर्यादित फॉर्म स्वीकारणे आणि “ऑनलाइन करा” अशी मिळणारी उत्तरे यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.



## भूमिका

**पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशातील पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या किमतीत झालेली वाढ सर्वसामान्यांच्या खिशावर मोठा भार टाकणारी ठरत आहे. तेल कंपन्यांनी १५ मेपासून पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ करताना आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा दाखला दिला.**

# पेट्रोल-डिझेल दरवाढ : ग्राहकांच्या खिशावर दुहेरी मार



सरकारच्या मते, कंपन्यांना पेट्रोलवर प्रतिलिटर २४ रुपये आणि डिझेलवर ३० रुपये तोटा होत आहे. मात्र या दाव्यामागचे गणित तपासले, तर अनेक प्रश्न उपस्थित होतात. केंद्र सरकारने वारंवार देशात ७४ दिवस पुरेल इतका कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले होते. म्हणजेच आतापर्यंत विकले गेलेले इंधन हे जुन्या आणि तुलनेने स्वस्त दराने खरेदी केलेल्या तेलावर आधारित होते.

असे असताना तेल कंपन्यांना अचानक मोठा तोटा कसा होऊ लागला, हा प्रश्न सामान्य नागरिकांना पडणे स्वाभाविक आहे. प्रत्यक्षात, १५ मे २०२६ रोजी ब्रेंट कच्च्या तेलाची किंमत आणि डॉलरचा दर लक्षात घेतल्यास पेट्रोलची मूळ किंमत साधारण ७० रुपयांच्या आसपास येते. मात्र ग्राहकांना त्यासाठी १०५ ते १०७ रुपये मोजावे लागत आहेत. म्हणजेच उर्वरित रक्कम कर आणि कंपन्यांच्या नफ्याच्या स्वरूपात आकारली जात आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे, कच्च्या तेलाच्या कमी किमती असताना भारताने मोठ्या प्रमाणात साठा करून ठेवला होता.

रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी करण्यात आले होते. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादन खर्च खूपच कमी असतानाही ग्राहकांना महाग दराने इंधन विकले गेले. तेल कंपन्या आणि सरकार यांचे आर्थिक गणित पाहता, तोट्यापेक्षा नफ्याचे चित्र अधिक स्पष्ट दिसते.

२०२४-२५ मध्ये केंद्र सरकारला पेट्रोल-डिझेलवरील करातून तब्बल ४ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळाला, तर राज्य सरकारांनाही मोठ्या प्रमाणात करउत्पन्न मिळाले. त्याचवेळी सरकारी तेल कंपन्यांनीही विक्रमी नफा कमावला आहे. तेल कंपन्यांचे व्यवहारही लक्षात घेण्यासारखे आहेत. त्या केवळ ब्रेंट दरानेच तेल खरेदी करत नाहीत, तर अनेक देशांशी दीर्घकालीन करार करून कमी किमतीत तेल घेतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात अचानक दरवाढ झाली, तरी त्याचा पूर्ण परिणाम तत्काळ कंपन्यांवर होत नाही.

उलट, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन झाले की कंपन्यांचा नफा वाढतो आणि सरकार त्यावर अतिरिक्त कर आकारून महसूल मिळवते. या प्रक्रियेत सर्वाधिक फटका बसतो तो सामान्य ग्राहकांना. आज पेट्रोल-डिझेल हे केवळ इंधन राहिलेले नाही, तर सरकारांसाठी मोठ्या महसुलाचे साधन बनले आहे. त्यामुळे दरवाढीचे खरे कारण युद्ध किंवा आंतरराष्ट्रीय परिस्थितीइतकेच कररचना आणि नफ्याचे धोरणही आहे. इंधनदरांच्या बाबतीत पारदर्शकता आणि जबाबदारीची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. अन्यथा महागाईचा वाढता भार सामान्य नागरिकांच्या खिशाला सतत कात्री लावत राहील.

## प्रासंगिक »

### ज्ञानाचा थेंब

**आद्यगुरु शंकराचार्य आपल्या शिष्यांसह हिमालय यात्रेला निघाले होते. प्रवासादरम्यान ते अलकनंदा नदीकाठी थांबले. नदीचे विशाल पात्र पाहून एक शिष्य म्हणाला.**

“आचार्य, तुमचे ज्ञान या नदीसारखे अथांग आहे. कदाचित महासागरापेक्षाही विशाल असेल.”

हे ऐकून शंकराचार्य स्मितहास्य करत नदीत आपला दंड बुडवून बाहेर काढला. त्यांनी शिष्याला विचारले,

“या दंडावर किती पाणी आले?” शिष्य म्हणाला, “फक्त एक थेंब.” त्यावर शंकराचार्य म्हणाले, “ही संपूर्ण नदी म्हणजे जगातील अपार ज्ञान समज.


आणि या दंडावरचा थेंब म्हणजे माझे ज्ञान. एवढेच ज्ञान माझ्याकडे आहे. ज्ञान जितके वाढते, तितकी नम्रता वाढली पाहिजे.”

शिष्याला आपल्या चुकीची जाणीव झाली. त्याने नम्रपणे आचार्यांना प्रणाम केला.

- तात्पर्य : **खरे ज्ञानी व्यक्ती कधीही गर्व करत नाहीत. जगातील ज्ञान अथांग आहे; त्यामुळे सतत शिकत राहणे आणि नम्र राहणे हाच खऱ्या ज्ञानाचा मार्ग आहे.**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील बीजिंग शिखर परिषद जगभर चर्चेचा विषय ठरली. व्यापार, इराण युद्ध आणि जागतिक शांततेसंदर्भात मोठे निर्णय होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.

# महासत्तांच्या संघर्षात भारतासमोरील नवे आव्हान



मात्र प्रत्यक्षात कोणताही ठोस निर्णय न घेता ही बैठक संपली. तरीही या भेटीतून जगाच्या भविष्यासंबंधी काही निर्णायक संकेत स्पष्ट झाले. या भेटीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तैवानबाबत चीनने अमेरिकेला दिलेला स्पष्ट इशारा. तैवान प्रश्न चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास अमेरिका आणि चीन यांच्यात थेट संघर्ष होऊ शकतो, असे जिनपिंग यांनी ठामपणे सांगितले.

“थुसिडिडीझ ट्रॅप”चा उल्लेख करून त्यांनी अमेरिका ही प्रस्थापित महासत्ता आणि चीन ही उदयोन्मुख महासत्ता असल्याचे अधोरेखित केले. उदयोन्मुख शक्तीचा उदय स्वीकारला नाही, तर संघर्ष अटळ ठरतो, हा इतिहासाचा धडा त्यांनी अमेरिकेला आठवण करून दिला. हा संदेश केवळ अमेरिकेलाच नव्हे, तर संपूर्ण जगालाच होता.

दुसरीकडे, अमेरिकेची सध्याची स्थितीही कमकुवत होताना दिसते. इराण युद्धामुळे आर्थिक आणि लष्करी संसाधनांवर ताण निर्माण झाला आहे. चीनकडून दुर्मीळ संयुगांचा पुरवठा मर्यादित ठेवला जात असल्याने अमेरिकेच्या उच्च तंत्रज्ञान उद्योगांवर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत चीनने तैवानवर कारवाई केल्यास अमेरिकेला तत्काळ प्रतिसाद देणे कठीण जाऊ शकते. त्यामुळे आशियातील सामरिक समतोल झपाट्याने बदलत असल्याचे स्पष्ट होते. या बदलत्या समीकरणांचा सर्वाधिक परिणाम भारतावर होण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत चीनला तोलण्यासाठी अमेरिकेने भारताला धोरणात्मक पाठबळ दिले होते. मात्र ट्रम्प यांच्या नव्या भूमिकेत भारताचे महत्त्व कमी झाल्याचे दिसते.

अमेरिका आणि चीन या दोन्ही महासत्ता भारताशी व्यापार करतात; पण भारताच्या हितासाठी ठामपणे उभ्या राहतील, अशी परिस्थिती नाही. रशियाचे जागतिक वर्चस्व कमी झाल्यानंतर भारतासाठी विश्वासार्ह मित्रशक्तीचा पर्यायही मर्यादित झाला आहे. त्यामुळे भारताने आता नव्या जागतिक वास्तवाचा स्वीकार करून अधिक स्वावलंबी आणि व्यावहारिक परराष्ट्र धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. महासत्तांच्या संघर्षात कोणावर अति अवलंबून न राहता स्वतःची आर्थिक, तांत्रिक आणि लष्करी क्षमता वाढवणे हाच भारतासाठी सुरक्षित मार्ग ठरू शकतो. ट्रम्प-जिनपिंग भेटीत अनेक प्रश्न अनिर्णित राहिले असले, तरी जगातील बदलत्या शक्तिसंतुलनाचे निर्णायक संकेत मात्र स्पष्टपणे समोर आले आहेत.

## || अभंगवाणी ||



विसरले कुळ आपुला आचार ।
पती भावे दीर घर सोय ॥१॥

सांडिला लौकिक लाज भय चिंता ।
रातलें अनंता चित्त माझें॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# चारपैकी तीन आरोपींची निर्दोष सुटका


## विशेष कायद्यांतर्गत दोषसिद्धीत राज्याची चिंताजनक कामगिरी

**महाईन्यूज । नागपूर**

**ॲट्रॉसिटी, पोक्सो, घरगुती हिंसाचार, एनडीपीएस कायदा, यांसारख्या विविध विशेष कायद्यांच्या अंतर्गत महाराष्ट्रात दोषसिद्धीचे अल्प प्रमाण असल्याची माहिती राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग 'एनसीआरबी'च्या अहवालातून पुढे आली. विशेष कायद्याच्या अंतर्गत राज्याचे दोषसिद्धी प्रमाण केवळ २६.५ टक्के आहे. म्हणजेच चारपैकी सुमारे तीन आरोपींची निर्दोष सुटका होत आहे. दोषसिद्धीची राष्ट्रीय सरासरी ७९.३ टक्के असताना महाराष्ट्र याबाबत फारच मागे आहे.**



भारतीय दंड संहिता (आयपीसी) किंवा आता भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत नोंदवले जाणारे गुन्हे हे आयपीसी स्वरूपातील मुख्य फौजदारी गुन्हे मानले जातात. यात खून, चोरी, दरोडा, फसवणूक, मारहाण, अपहरण, बलात्कार, विश्वासघात, यांसारख्या गुन्ह्यांचा समावेश होतो. दुसरीकडे, पोक्सो, अमली पदार्थविरोधी (एनडीपीएस) कायदा, माहिती तंत्रज्ञान (आयटी) कायदा, ॲट्रॉसिटी कायदा, शस्त्रास्त्र कायदा, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, वाहतूक नियमभंग, दारूबंदी तसेच मानवी तस्करीसंदर्भातील कायद्यांअंतर्गत नोंदवले जाणारे गुन्हे हे विशेष कायद्यांतील (एसएलएल) गुन्हे मानले जातात. 'एनसीआरबी'च्या २०२४ च्या अहवालानुसार, देशातील मोठ्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात विशेष कायद्याच्या अंतर्गत दोषसिद्धीचे प्रमाण अतिशय कमी आहे. यात मध्यप्रदेश (९०.४ टक्के), उत्तर प्रदेश (८६.३ टक्के), राजस्थान (८९.१ टक्के), तमिळनाडू (८९ टक्के), बिहार (७५ टक्के) ही राज्ये महाराष्ट्रापेक्षा फार पुढे आहे.



### प्रलंबित खटल्यांमध्येही वाढ

विशेष कायद्यांच्या अंतर्गत प्रलंबित खटल्यांमध्येही वाढ बघायला मिळत आहे. अहवालानुसार, २०२२ मध्ये प्रलंबित खटल्यांचे प्रमाण ९३.९ टक्क्यावर होते. २०२३ मध्ये हे प्रमाण ९४.२ टक्के झाले तर यंदा २०२४ मध्ये यात वाढ होऊन ९४.४ टक्के झाले आहे. प्रलंबित खटल्यांमध्ये राष्ट्रीय सरासरी ८३.५ टक्के असून राज्य या आकड्यापासून फार दूर आहे. उल्लेखनीय म्हणजे, विशेष कायद्यांतर्गत दाखल गुन्हे निकाली काढण्यासाठी राज्याद्वारे विशेष न्यायालयांची स्थापना केली जाते. या न्यायालयांमध्ये वेगाने खटले निकाली निघणे अपेक्षित असताना मोठ्या संख्येतील प्रलंबित खटले चिंताजनक बाब ठरत आहे.

### तीन वर्षांपासून समान स्थिती

विशेष कायद्याच्या अंतर्गत देशात दोषसिद्धीची सरासरी ७९.३ टक्के असताना महाराष्ट्राची कामगिरी अतिशय साधारण असणे ही फार चिंताजनक बाब आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, विशेष कायद्यांच्या अंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये मागील तीन वर्षांचा विचार केला तर राज्याच्या कामगिरीत काही अंशी सुधारणा झाली आहे, मात्र राष्ट्रीय सरासरीपेक्षा अद्यापही महाराष्ट्र फार मागे असल्याचे चित्र आहे. 'एनसीआरबी'च्या अहवालानुसार, २०२२ मध्ये दोषसिद्धीचे प्रमाण २१.४ टक्के होते तर २०२३ मध्ये २७.९ टक्के झाले. यंदा २०२४ यात किंचित घट झाली असून हे प्रमाण २६.५ टक्क्यांवर आले आहे.

## मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेनची पहिली झलक समोर; रेल्वे मंत्रालयाकडून डिझाईन प्रसिद्ध

**महाईन्यूज । मुंबई**

**देशातील पहिल्या-वहिल्या बुलेट ट्रेनचा फोटो समोर आला आहे. भारतीय रेल्वे मंत्रालयाच्या वतीने या ड्रिम प्रोजक्टच्या ट्रेनचा फोटो प्रसिद्ध केला आहे. देशातील पहिली बुलेट ट्रेन अहमदाबाद आणि मुंबई या दोन महत्वाच्या शहरांना जोडणार आहे. नवी दिल्लीतील रेल्वे मंत्रालयाच्या गेट क्रमांक ०४ येथे बुलेट ट्रेनचा फोटा लावण्यात आला आहे. या फोटोत बुलेट ट्रेनचे डिझाईन स्पष्टपणे दिसून येत आहे.**



एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, देशातील पहिल्या-वहिल्या नियोजित बुलेट ट्रेनचा फोटो समोर आला आहे. रेल्वे मंत्रालयाच्या गेट क्रमांक ०४ येथे हा फोटो लावण्यात आला आहे. रेल्वे मंत्रालयाच्या हवाल्याने एएनआयने माहिती प्रसिद्ध केली आहे. वेगाने धावणारी ही देशातील पहिली ट्रेनसेवा असणार आहे.

मुंबई आणि अहमदाबाद या दोन शहरांना जोडणारी बुलेट ट्रेन मोदी सरकारचा ड्रिम प्रोजेक्ट आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, भाजपा सरकार पुढील वर्षी म्हणजेच १५ ऑगस्ट २०२७ रोजी या ट्रेनसेवेचे लोकार्पण करणार आहे. गुजरात आणि महाराष्ट्रातील दोन महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या बुलेट ट्रेनमुळे प्रवास वेळेचे मोठी बचत होणार आहे. मुंबई ते अहमदाबाद हे अंतर अवघ्या दोन तासांत गाठता येणार आहे.

राष्ट्रीय हायस्पीड रेल्वे प्राधिकरणाच्या वतीने अहमदाबाद – मुंबई बुलेट ट्रेन लोहमार्गातील महत्वाच्या बोगद्याबाबत माहिती दिली. बोगद्याचे काम प्रगतीपथावर आल्याचेही प्राधिकरणाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. २१ किलोमीटर लांबीच्या मुंबई बोगद्याच्या १६ किलोमीटरच्या भागाच्या बांधकामासाठी प्रत्येकी ३००० टनांपेक्षा जास्त वजनाची दोन टीबीएम (टनल बोरिंग मशीन) जोडली जात आहेत. या टप्प्यात ठाणे खाडीखालून जाणाऱ्या ७ किलोमीटर लांबीच्या समुद्राखालच्या बोगद्याचा समावेश आहे, हा भारतातील पहिला समुद्राखालचा रेल्वे बोगदा असेल, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### सहा किलोमीटर लांबीचा बोगदा

बुलेट ट्रेनच्या कामासाठी तैनात करण्यात आलेल्या टनल बोरिंग मशीन देशातील आतापर्यंतची सर्वात मोठी मशीन असल्याचे पीटीआयच्या वृत्तात म्हटले आहे. विक्रोळी ते बीकेसीला जोडणाऱ्या सहा किलोमीटर लांबीच्या बोगद्याचे का या मशीनच्या मदतीने हा बोगदा खोदण्यात येईल. हा बोगदा बीकेसी येथील बांधकाम सुरू असलेल्या मुंबई बुलेट ट्रेन स्थानकापर्यंत पोहोचण्यापूर्वी दाट लोकवस्तीच्या शहरी भाग आणि मिठी नदीच्या खालून जाईल, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# आता इंटरनेटचाही गळा आवळणार?

## इराणच्या नव्या योजनेमुळे गुगल, मेटा, ॲमेझॉन संकटात!

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका आणि इस्रायलसोबत सुरू असलेल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराण आता जगाला एका नव्या संकटात टाकण्याच्या तयारीत आहे. आतापर्यंत केवळ कच्च्या तेलाच्या (ऑइल) वाहतुकीसाठी धोक्याची बनलेली 'हॉर्मुझची समुद्रधुनी' (STRAIT OF HORMUZ) आता जागतिक इंटरनेटसाठी सर्वात मोठा 'चोकपॉईंट' बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणच्या या नव्या भूमिकेमुळे गुगल, मेटा, ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या बलाढ्य टेक कंपन्यांचे धाबे दणाणले आहेत.**



सर्वसामान्यांना वाटते की इंटरनेट सॅटेलाईटद्वारे चालते, पण प्रत्यक्षात जगातील ९५% पेक्षा जास्त इंटरनेट ट्रॅफिक समुद्राच्या तळाशी पसरलेल्या 'फायबर-ऑप्टिक केबल्स' (Submarine Cables) मधून प्रवास करतो. आशिया, युरोप आणि आखाती देशांना जोडणाऱ्या या मुख्य केबल्स हॉर्मुझच्या समुद्रधुनीजवळून जातात.

इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' (IRGC) शी संबंधित माध्यमांनी संकेत दिले आहेत की, या केबल्स इराणच्या सागरी हद्दीजवळून जात असल्याने, आता इराण त्यावर नियंत्रण मिळवू पाहत आहे. या कंपन्यांकडून कर वसूल करणे, केबल्सच्या दुरुस्तीवर देखरेख ठेवणे आणि सहकार्य न केल्यास डेटा ट्रॅफिक रोखणे, असा इराणचा बेत आहे. असे वृत्त 'न्यूज१८' ने दिले आहे.

गेल्या काही वर्षांत गुगल, मेटा आणि ॲमेझॉन सारख्या कंपन्यांनी स्वतःचे क्लाउड नेटवर्क आणि डेटा स्पीड टिकवून ठेवण्यासाठी या समुद्राखालील केबल्समध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. जर इराणने या केबल्समध्ये कोणताही हस्तक्षेप केला, तर फक्त सोशल मीडियाच नाही, तर जागतिक बँकिंग व्यवस्था, शेअर बाजार (स्टॉक मार्केट), क्लाउड सर्व्हर्स आणि विमान वाहतूक यंत्रणा ठप्प होऊ शकते.

### भारतावर काय परिणाम होणार?

या डिजिटल युद्धामुळे भारताला मोठा फटका बसू शकतो. भारताचा युरोपशी जोडणारा इंटरनेट डेटा याच आखाती मार्गावरून जातो. जर येथे केबल्स ब्लॉक झाल्या किंवा विस्कळीत झाल्या, तर भारतातील कोट्यवधी युजर्सचे इंटरनेट संथ होईल, ऑनलाइन पेमेंट यंत्रणा मंदावतील आणि आयटी (IT) कंपन्यांचे मोठे नुकसान होऊ शकते.

## ममता सरकारच्या धर्मआधारित मानधन योजना बंद; सुवेंदु कॅबिनेटचा मोठा निर्णय

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगालमध्ये नव्याने सत्तेवर आलेल्या सुवेंदु अधिकारी सरकारने दुसऱ्याच कॅबिनेट बैठकीत अत्यंत मोठे आणि धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. राज्यातील धर्मआधारित मानधन योजना टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, महिलांसाठी मात्र मोठी घोषणा केली आहे. भाजपच्या जाहीरनाम्यातील आश्वासनानुसार, राज्यातील महिलांना आता दरमहा ३,००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.**



कॅबिनेट बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना नगरविकास मंत्री अग्निमित्रा पॉल यांनी सांगितले की, मदरसा विभाग आणि माहिती व सांस्कृतिक विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या सर्व धर्मआधारित आर्थिक साहाय्य योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या सुरू असलेल्या योजना या महिन्याच्या अखेरपर्यंत सुरू राहतील आणि त्यानंतर त्या पूर्णपणे बंद केल्या जातील.



यापूर्वीच्या तृणमूल काँग्रेस (TMC) सरकारने २०१२ मध्ये मुस्लिम धर्मगुरूंसाठी (इमाम) ३,००० रुपये, तर सप्टेंबर २०२० मध्ये हिंदू पुरोहितांसाठी २,००० रुपये मासिक मानधन योजना सुरू केली होती. आता नवीन सरकारने ही भेदभाव करणारी व्यवस्था मोडीत काढण्याचे ठरवले आहे.

याच बैठकीत सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'अन्नपूर्णा योजना' मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत १ जूनपासून राज्यातील महिलांना दरमहा ३,००० रुपये दिले जातील. ज्या महिलांना आधीपासूनच 'लक्ष्मी भंडार' योजनेचा लाभ मिळत आहे, त्यांना थेट या योजनेत समाविष्ट केले जाईल. उर्वरित महिलांसाठी एक नवीन पोर्टल सुरू केले जाणार आहे. याशिवाय, १ जूनपासून संपूर्ण राज्यात महिलांसाठी मोफत बस प्रवासाची सुविधाही लागू करण्यात आली आहे.

### सुवेंदु अधिकारींचा पहिला 'जनता दरबार'

९ मे रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुवेंदु अधिकारी यांनी सॉल्ट लेक येथील भाजप कार्यालयात आपला पहिला 'जनता दरबार' भरवला. यात त्यांनी सामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या समस्या, तक्रारी थेट ऐकून घेतल्या. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या धर्तीवर पश्चिम बंगालमध्येही आता असे जनता दरबार नियमितपणे आयोजित केले जातील, असे पक्षाकडून सांगण्यात आले.

### 'डबल इंजिन' सरकारचा वेगवान कारभार

भाजपने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर पोस्ट करत आपल्या पहिल्या आठवड्यातील (९ मे ते १६ मे) कामगिरीचा लेखाजोखा मांडला आहे. "जे काम तृणमूल सरकार १५ वर्षांत करू शकले नाही, ते 'डबल इंजिन' सरकारने पहिल्याच आठवड्यात करून दाखवले आहे. हा नवा पश्चिम बंगाल असून हाच खऱ्या प्रशासनाचा वेग आहे," असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे.

# कान्समध्ये डायना पेंटीचा पारंपरिक जलवा..



कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये भारतीय कलाकारांचा ग्लॅमरस अंदाज सतत चर्चेत आहे. आलिया भट्ट, हुमा कुरेशी आणि अदिती राव हैदरी यांच्यानंतर आता अभिनेत्री डायना पेंटी हिनेही आपल्या पारंपरिक लूकने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. कान्समधील तिच्या खास साडी लूकची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. डायना पेंटीने कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये भारत पॅव्हेलियनमध्ये आयोजित चर्चासत्रात सहभाग घेतला. या खास कार्यक्रमासाठी तिने भारतीय पारंपरिक पोशाखाची निवड केली. तिने प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी डिझाइन केलेली गोल्डन रंगाची आकर्षक साडी परिधान केली होती. या साडीत डायना अतिशय देखणी आणि राजेशाही अंदाजात दिसत होती. डायनाची ही साडी साधी नसून अत्यंत वेगळ्या पद्धतीने ड्रेप करण्यात आली होती. पारंपरिक साडीला मॉडर्न टच देण्यासाठी तिने त्यासोबत गोल्डन जॅकेटही परिधान केलं होतं. त्यामुळे तिचा संपूर्ण लूक अधिक उठून दिसत होता. या हटके स्टाइलमुळे चाहत्यांनी तिच्या फॅशन सेन्सचं भरभरून कौतुक केलं. या लूकला अधिक आकर्षक बनवण्यासाठी डायनाने स्मोकी आय मेकअप केला होता. गोल्डन साडी, स्टायलिश जॅकेट आणि ग्लॅमरस मेकअपमुळे ती एखाद्या अप्सरेसारखी दिसत होती. सोशल मीडियावर तिच्या फोटोंना मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. डायनाच्या या लूकवर डिझायनर मनीष मल्होत्रा यांनीही प्रतिक्रिया दिली. त्यांनी कमेंट सेक्शनमध्ये हार्ट इमोजी पोस्ट करून तिच्या लूकचं कौतुक केलं. तसेच मेकअप आर्टिस्ट शान मुत्ताथिल यांनीही डायनाच्या स्टाइलचं विशेष कौतुक केलं आहे. डायना पेंटीने आपल्या पोस्टच्या कॅप्शनमध्येही खास संदेश लिहिला. ती म्हणाली की, “भारत पॅव्हेलियनमध्ये मनीष मल्होत्रांनी डिझाइन केलेली खास साडी परिधान केली आहे. भारतात गोल्डन रंग हा फक्त एक रंग नसून त्याला सांस्कृतिक महत्त्व आहे.” तिच्या या विचारांनाही चाहत्यांनी चांगला प्रतिसाद दिला. दरम्यान, कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये डायना पेंटीने ‘इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया’च्या कार्यक्रमातही सहभाग घेतला. यावेळी तिच्यासोबत दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर उपस्थित होते. डायनाने त्यांच्यासोबतचे काही फोटोही सोशल मीडियावर शेअर केले आहेत. कान्स २०२६ मध्ये भारतीय अभिनेत्रींचे पारंपरिक आणि ग्लॅमरस लूक सतत चर्चेत असताना, डायना पेंटीने आपल्या हटके साडी स्टाइलने एक वेगळी छाप पाडली आहे.

## कान्समध्ये हुमा कुरेशीची भन्नाट एन्ट्री



फ्रान्समध्ये सुरू असलेल्या कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये भारतीय कलाकारांचा जलवा पाहायला मिळत आहे. अनेक बॉलिवूड अभिनेत्री आपल्या स्टायलिश आणि ग्लॅमरस लूकमुळे चर्चेत आहेत. अशातच अभिनेत्री हुमा कुरेशी हिने सोशल मीडियावर शेअर केलेल्या काही फोटोंमुळे चाहत्यांचे विशेष लक्ष वेधले आहे. या फोटोंमध्ये तिच्यासोबत थेट साऊथ सुपरस्टार यश नसला, तरी त्यांची उपस्थिती खास पद्धतीने दिसून आली. हुमा कुरेशीने कान्समधील काही मजेशीर फोटो आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केले. या फोटोंमध्ये ती यश यांच्या फोटो असलेल्या एका मॅगझिनसोबत फिरताना दिसली. फोटोंसोबत तिने दिलेलं कॅप्शनही सध्या चांगलंच व्हायरल होत आहे. “मी आणि यश कान्समध्ये फिरतोय,” असं तिने हलक्याफुलक्या अंदाजात लिहिलं. यासोबतच तिने ‘टॉक्सिक’ चित्रपटाच्या टीमची आठवण येत असल्याचंही सांगितलं. हुमा कुरेशीची ही पोस्ट सोशल मीडियावर येताच चाहत्यांनी भन्नाट प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली. अनेकांनी यशच्या स्टाईलचं कौतुक केलं, तर काहींनी हुमा कुरेशीच्या विनोदी स्वभावाचंही भरभरून अभिनंदन केलं. एका यूजरने मजेशीर कमेंट करत लिहिलं की, “आता राधिका पंडित कान्सला जाण्याची तयारी करत असतील.” राधिका पंडित या यश यांच्या पत्नी आहेत. या कमेंटवरही सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली. यंदाच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये हुमा कुरेशीचे वेगवेगळे लूक सतत चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी ती काळ्या रंगाच्या आकर्षक गाऊनमध्ये दिसली होती. त्यानंतर तिने परिधान केलेली बनारसी साडीही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. पारंपरिक आणि मॉडर्न अशा दोन्ही अंदाजात हुमा चाहत्यांना भावताना दिसत आहे. दरम्यान, हुमा कुरेशी आणि यश हे दोघेही ‘टॉक्सिक’ या बहुचर्चित चित्रपटात एकत्र झळकणार आहेत. या चित्रपटाची चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. चित्रपटात कियारा अडवाणी, नयनतारा, तारा सुतारिया आणि रुक्मिणी वसंत यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचं दिग्दर्शन गीतू मोहनदास यांनी केलं आहे. विशेष म्हणजे, या सिनेमात यश दुहेरी भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा आहे.

## ह्ता दुर्गुळेच्या सासूबाईंची 13 वर्षांनी मालिकेत एन्ट्री



अभिनेत्री ह्ता दुर्गुळेने अनेक मालिका, चित्रपट, नाटकांमध्ये काम केले आहे. मात्र ह्ताच्या खऱ्या आयुष्यातील सासू आता पुन्हा एकदा मालिकेत पाहायला मिळणार आहे. ह्ताच्या पहिल्या ‘दूर्वा ‘ मालिकेत त्यांनी ऑनस्क्रीन सासुबाईंची भूमिका साकारली होती. तब्बल 13 वर्षांनी मुग्धा शहा मालिका विश्वात परतणार आहेत. स्टार प्रवाहवरील आनंदी मालिकेत खलनायिकेच्या भूमिकेत त्या दिसणार आहेत. अभिनेत्री मुग्धा शहा मालिकेत शिल्पा निंबाळकर हे पात्र साकारत आहेत. दुर्वा मालिकेनंतर त्या स्टार प्रवाहसोबत काम करत आहेत. काही दिवसांपूर्वीच सुरू झालेली आनंदी मालिका सध्या प्रेक्षकांचं मन जिंकत आहे. अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या या मालिकेत शिल्पा निंबाळकर या पात्रामुळे वादळ येणार आहे. या पात्राविषयी सांगताना मुग्धा शाह म्हणाल्या ‘ मी 35 वर्ष अभिनय क्षेत्रात काम करत आहे. या काळात जवळपास 80% भूमिका मी खलनायिकेच्या साकारल्या आहेत. या मालिकेत शिल्पा निंबाळकर या पात्राचा दरारा आहे. शिल्पा ही युगंधरची मोठी बहीण. तिने प्रेमासाठी एका गरीब मुलाशी लग्न केलं. पण लग्नानंतर मूल होत नसल्यामुळे तिच्या नवऱ्याने तिला सोडून दिलं.

# टेनिस स्पर्धेत स्विटोलिना विजेती

## आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत युक्रेनला एकेरीचे जेतेपद

**महाईन्यूज** । रोम

**2026 च्या इटालियन खुल्या मास्टर्स 1000 दर्जाच्या पुरुष आणि महिलांच्या आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत युक्रेनच्या इलिना स्विटोलिनाने एकेरीचे जेतेपद मिळविताना अंतिम सामन्यात अमेरिकेच्या कोको गॉफचा फडशा पाडला. या स्पर्धेत इटलीच्या जेनिक सिनरने एकेरीची अंतिम फेरी गाठली आहे.**



महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात स्विटोलिनाने कोको गॉफचा 6-4, 6-7 (3-7), 6-2 अशा तीन सेट्समधील लढतीत पराभव केला. हा अंतिम सामना तीन तास चालला होता. मात्र गॉफला या स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी अंतिम फेरीत हार पत्करावी लागली आहे. 2018 मध्ये रोम येथे स्विटोलिनाने डब्ल्यूटीए टूरवरील 1000 दर्जाची स्पर्धा जिंकल्यानंतर तिचे हे दुसरे जेतेपद आहे. 2016 पासून रोममधील या स्पर्धेत विजेतेपद मिळविण्यासाठी गॉफचे प्रयत्न चालू होते. पण यावर्षी तिला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. आतापर्यंत रोममधील ही स्पर्धा या अमेरिकन टेनिसपटूला जिंकता आलेली नाही. गेल्या वर्षी फ्रेंच ग्रँडस्लॅम स्पर्धेत गॉफला जस्मिन पॉओलिनीकडून पराभव पत्करावा लागला होता.

पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात इटलीच्या सिनरने रशियाच्या डॅनिल मेदव्हेदेवचा 6-2, 5-7, 6-4 अशा सेट्समध्ये पराभव करत अंतिम फेरी गाठली. आता सिनरचा अंतिम सामना कास्पर रुडशी होणार आहे.



# संजू सॅमसनने मोडला महेंद्र सिंह धोनीचा सर्वात मोठा विक्रम!

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**चेपॉकच्या मैदानावर सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील सामन्यात इतिहास रचला गेला. अनेक वर्षांपासून महेंद्रसिंग धोनीच्या नावावर असलेला विक्रम आता संजू सॅमसनने मोडला आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात संजू सॅमसनने अवघ्या १३ चेंडूंमध्ये २७ धावा ठोकल्या. आपल्या या छोट्याशा खेळीत त्याने पाच चौकार आणि एका षटकारासह धोनीचा मोठा विक्रम मोडित काढला आहे.**



चेन्नई सुपर किंग्सने हैदराबादविरूद्ध सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यासह चेन्नईने ७ विकेट्स गमावत १८० धावा केल्या. चेन्नईच्या सर्व फलंदाजांनी ही धावसंख्या गाठण्यात कमी अधिक प्रमाणात हातभार लावला. तर डेवाल्ड ब्रेविसने सर्वाधिक ४४ धावांची खेळी केली.

संजू सॅमसनने धोनीचा विक्रम मोडत, चेन्नई सुपर किंग्ससाठी यष्टीरक्षक म्हणून एकाच हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा मान मिळवला आहे. धोनीने २०१३ च्या हंगामात चेन्नईसाठी यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून १६ डावांमध्ये ४६१ धावा केल्या होत्या. हा विक्रम मोडण्यासाठी संजू सॅमसनला केवळ १२ धावांची गरज होती आणि त्याने अत्यंत आक्रमक सुरुवात करत ही कामगिरी केली. सॅमसनने नितीश कुमार रेड्डीच्या पहिल्याच षटकात १५ धावा करून धोनीचा विक्रम मोडला.

एकाच हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या यष्टीरक्षक-फलंदाजांच्या या विशेष यादीतील पहिल्या १० खेळाडूंमध्ये धोनी आणि सॅमसनच्या व्यतिरिक्त इतर कोणाचाही समावेश नाही. खरं तर, सीएसकेसाठी एकाच हंगामात १०० पेक्षा जास्त धावा करणारे केवळ तीन यष्टीरक्षक आहेत. यामध्ये धोनी, पार्थिव पटेल आणि आता संजू सॅमसन यांचा समावेश आहे.

सॅमसन सुरुवातीपासूनच चांगल्या लयीत दिसत होता. त्याने प्रफुल्ल हिंगेच्या षटकात सलग तीन चौकार मारले आणि अवघ्या ११ चेंडूंमध्ये २७ धावा करून वादळी फटकेबाजी करत होता. मात्र, त्यानंतर सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स गोलंदाजीसाठी आला आणि त्याने कमालीच्या चेंडूवर सॅमसनला बाद करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली.

त्याने आधी यॉर्कर टाकून दबाव निर्माण केला आणि नंतर ऑफ-स्टंपच्या बाहेर चेंडू टाकून त्याला चूक करण्यास भाग पाडलं आणि बॅटची कड घेत चेंडू थेट यष्टीरक्षकाच्या हातात गेला. संजू सॅमसन या मोसमात ५०० धावा करण्याच्या अगदी जवळ आहे. तो पुढच्या सामन्यात हा टप्पा गाठू शकतो. त्याने या मोसमात १३ सामन्यांमध्ये आधीच ४७७ धावा केल्या आहेत.

## संजूच्या खेळीमुळे चेन्नईची दमदार सुरुवात

संजू सॅमसनच्या या खेळीमुळे चेन्नईच्या डावाला दमदार सुरुवात मिळाली. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे हैदराबादच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच दबाव निर्माण झाला होता. विशेष म्हणजे, यंदाच्या मोसमात सॅमसन सातत्याने संघासाठी मोठ्या धावा करताना दिसत आहे. मधल्या फळीत आलेल्या फलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिल्यामुळे चेन्नईला मोठी धावसंख्या उभारता आली. ब्रेविसने संयमी आणि आक्रमक खेळीचे उत्तम मिश्रण दाखवत संघाचा डाव सावरला. दुसरीकडे, हैदराबादच्या गोलंदाजांनी शेवटच्या षटकांमध्ये पुनरागमन करत चेन्नईला २०० धावांचा टप्पा गाठण्यापासून रोखले. या धावसंख्येचा पाठलाग करताना हैदराबादच्या फलंदाजांवर मोठी जबाबदारी होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। मंगळवार ।

दि. 19 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# भोसरी रुग्णालयात सुविधांचा तुटवडा; रुग्णांचा वाढता ताण

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या भोसरीतील 130 खाटांच्या नवीन रुग्णालयात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे चित्र समोर आले आहे. भोसरी, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव, धावडेवस्ती आदी परिसरांतील नागरिक मोठ्या संख्येने उपचारासाठी येथे येत असल्याने रुग्णांचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, अपुऱ्या सुविधा आणि जागेअभावी रुग्णांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रुग्णालयात बाह्य व आंतररुग्ण विभाग, जन्म-मृत्यू नोंद, औषध वितरण, लसीकरण, गरोदर माता तपासणीसाठी स्वतंत्र कक्ष, तसेच 13 प्रकारच्या ओपीडी सुविधा उपलब्ध आहेत. सोनोग्राफी, एक्स-रे, रक्त तपासणी, दंतरोग विभाग, कुटुंबकल्याण सेवा यांसह विविध सुविधा सुरू आहेत. प्रसूतीगृहासाठी 70 बेड, मेडिसीनसाठी 40 बेड, आयसीयूचे 10 बेड तसेच एनआयसीयूचीही व्यवस्था आहे.

मात्र, रुग्णालयात सर्जिकल वॉर्ड आणि सर्जिकल आयसीयूचाच अभाव आहे. सर्जन उपलब्ध नसल्याने जनरल सर्जरी होत नाहीत. तसेच ऑर्थोपेडिक विभाग नसल्याने अपघातग्रस्त रुग्णांवर उपचार करण्याची कोणतीही सुविधा नाही. त्यामुळे गंभीर रुग्णांना अन्य रुग्णालयात हलवावे लागते.

याशिवाय, रुग्णालयात कॅन्टिन सुविधा नसल्याने रुग्ण व नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. तपासण्यांसाठी उपाशी राहावे लागणाऱ्या रुग्णांना अन्नाची सोय नसल्याने अडचणी निर्माण होतात. ओपीडीसाठी जागा अपुरी असल्याने रुग्णालयात मोठी गर्दी होते. बसण्याची अपुरी व्यवस्था असल्याने विशेषतः गरोदर महिला व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होते.

दरम्यान, रुग्णालयात कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवत असून कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. या कर्मचाऱ्यांची वारंवार बदली होत असल्याने कामकाजावर परिणाम होत आहे. परिणामी उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत आहे. या सर्व समस्यांमुळे नागरिकांकडून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे.

## सुविधांचा अभाव; रुग्णांची गैरसोय

भोसरीतील नवीन रुग्णालयात सर्जिकल व ऑर्थोपेडिक विभाग नसल्याने गंभीर रुग्णांना अन्यत्र हलवावे लागते, तर ओपीडीतील गर्दी, अपुरी जागा, कॅन्टिनची अनुपस्थिती आणि कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे रुग्ण व नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार वाढणाऱ्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर तातडीने सुविधा वाढवण्याची मागणी होत आहे.





# ‘शतप्रतिशत भाजपा’चा विचार घराघरांत पोहोचवा

## पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि तंत्रज्ञानाचा वापर यावर चर्चा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय जनता पार्टी परिवाराच्या वतीने देशभरात सुरू असलेल्या ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६’ अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याचा भव्य प्रशिक्षण वर्ग नुकताच लोणावळा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि तंत्रज्ञानाचा वापर यावर सखोल चर्चा करण्यात आली.**




दोन दिवस चाललेल्या या महाअभियामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख व महत्त्वाच्या राजकीय नेत्यांनी सहभागी होत एकूण १२ विविध विषयांवर मार्गदर्शन केले. दोन दिवस चाललेल्या या निवासी जिल्हा प्रशिक्षण वर्गाला १५० पेक्षा अधिक पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ‘शतप्रतिशत भाजपा’ हा विचार आता प्रत्येक घराघरात पोहोचवण्याचे आणि भारतीय जनता पक्षाचे कमळ घराघरापर्यंत नेण्याचे आवाहन केले. देशात अडीच हजारांहून अधिक राजकीय पक्ष असले, तरी केवळ भाजपामध्येच शाश्वत कार्य निरंतर सुरू राहणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवड शहरात सध्या भाजपाचा सुवर्णकाळ सुरू असल्याचे नमूद करत कार्यकर्त्यांनी सामान्य नागरिकांना ‘हवेहवेसे’ वाटतील असे काम केले पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला. सार्वजनिक जीवनात वावरताना आपल्या कोणत्याही वागण्यामुळे पक्षाची प्रतिमा मलिन होणार नाही, याची प्रत्येकाने अत्यंत काळजी घेतली पाहिजे. पक्षात काम करताना मान-पान आणि प्रतिष्ठा आपापसात ठेवावी, परंतु मिळालेल्या प्रत्येक मानाचा सन्मान करणे देखील तितकेच आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवडच्या गल्लीगल्लीत भाजपा दिसला पाहिजे आणि संघटनेच्या दृष्टीने प्रत्येक कार्यकर्ता महत्त्वाचा असल्याने प्रत्येकाने पक्ष शिस्त आपल्या आचरणात आणली पाहिजे. पक्षात काम करणाऱ्या प्रत्येक प्रामाणिक कार्यकर्त्याला संधी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा आमदार चित्राताई वाघ, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, जिल्हा प्रभारी ॲड. भरत पाटील, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार अश्विनी जगताप, माजी खासदार अमर साबळे, या जिल्हा प्रशिक्षण महाअभियानाचे प्रमुख व संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांच्यासह अभियान सहप्रमुख मधुकर बच्चे, संजय परळीकर, संजय पटणी, पक्षाचे नगरसेवक राहुल कलाटे, युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, दक्षिण भारतीय आघाडीचे माजी अध्यक्ष राजेश पिल्ले, सरचिटणीस विकास डोळस, वैशाली खाडे आदी प्रमुख जिल्हा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष व अपेक्षित पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वात या जिल्हा प्रशिक्षण वर्गाचे संपूर्ण नियोजन व व्यवस्थापन पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचे पिंपरी चिंचवड जिल्हा प्रमुख व संगठन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी अत्यंत नेटकेपणाने केले. यावेळी त्यांना मधुकर बच्चे, संजय परळीकर, संजय पटणी, भूषण जोशी, अमेय देशपांडे, सचिन राऊत यांनी सहाय्य केले.

या दोन दिवसीय प्रशिक्षण महाअभियानाला पिंपरी-चिंचवड जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अशा प्रशिक्षण वर्गांमुळे कार्यकर्त्यांना वैचारिक बळ मिळत असून संघटन अधिक सक्षम, शिस्तबद्ध आणि गतिमान होत आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत सेवा, विकास आणि राष्ट्रहिताचा विचार पोहोचविण्यासाठी हे प्रशिक्षण निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास सर्व नेत्यांनी आणि आयोजकांनी व्यक्त केला.




### कार्यक्रमाचे भव्य उद्घाटन

पिंपरी चिंचवड जिल्हा प्रशिक्षण वर्गात सहभागी प्रशिक्षणार्थींना पक्षाची स्थापने पासून ची सर्व माहिती असणारी भव्य प्रदर्शनी कार्यरक्रम स्थळी उभारण्यात आली होती या भव्य प्रदर्शनीचे व जिल्हा प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भारतमाता, डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी व पं.दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून झाले.

### दिवस पहिला

- उद्घाटन सत्रानंतर पहिल्या दिवशी कार्यकर्त्यांना वैचारिक आणि संघटनात्मक पातळीवर सक्षम करण्यासाठी विविध सात सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.
- सकाळी ११:०० ते १२:०० या वेळेत झालेल्या पहिल्या सत्रात महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्राताई वाघ यांनी ’व्यावहारिक सत्र’ घेत कामकाजाचे महत्त्व विषद केले.
- दुपारी दुसऱ्या सत्रात १२:०० ते ०१:०० या वेळेत प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे यांनी पक्षाच्या ’वैचारिक अधिष्ठान’ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.
- दुपारी ०१:०० ते ०२:०० या वेळेत सर्व उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.
दुपारच्या तिसऱ्या सत्रात ०२:०० ते ०३:०० या वेळेत विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी ‘कार्य विस्तार’ या विषयावर कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

### दिवस दुसरा

- प्रशिक्षण वर्गाच्या दुसऱ्या दिवसाची सकाळी ०६ वाजता सुरुवात ’योगा व व्यायाम’ सत्राने झाली, ज्यामध्ये कार्यकर्त्यांनी उत्साहाने भाग घेतला. हे सत्र माजी नगरसेवक राजू दुर्गे यांनी घेतले.
- त्यानंतर सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत आठव्या सत्रात सत्रात पश्चिम महाराष्ट्राचे विभागीय संवादक योगेशजी बाचल यांनी ‘बूथ व्यवस्थापन, ६ स्थायी कार्यक्रम, मन की बात आणि SIR’ या संघटनात्मक विषयांवर महत्त्वपूर्ण धडे दिले.
- सकाळी ११:०० ते १२:०० या वेळेत नवव्या सत्रात विधान परिषदेचे आमदार सुनीलजी कर्जतकर यांनी ‘भाजपा इतिहास’ या विषयावर सविस्तर मांडणी करत पक्षाच्या प्रवासाची माहिती दिली.
- दुपारी १२:०० ते ०१:०० या वेळेत झालेल्या दहाव्या सत्रात पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी ‘अंत्योदयातील संतृप्तता, मोदी सरकारच्या गरिबांसाठीच्या योजना व सरकारची कामगिरी या विषयावर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.
- दुपारी ०१:३० ते ०२:३० या वेळेत अकराव्या सत्रात प्रदेश प्रवक्ते विश्वास पाठक यांनी ‘सोशल मीडिया, AI, नमो APP, SARAL APP’ या आधुनिक तंत्रज्ञान विषयक सत्रात कार्यकर्त्यांना डिजिटल युगात कसे काम करावे, याचे तंत्र शिकवले.
- दुपारी ०२:३० ते ०३:०० या वेळेत झालेल्या बाराव्या आणि अंतिम सत्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पिंपरी-चिंचवड महानगरचे जिल्हा कार्यवाह नरेंद्रजी पेंडसे यांनी ‘विचार परिवार’ या विषयावर मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांना वैचारिक दिशा दिली.

# मंगला कदम यांचा दावा अन् योगेश बहल यांची ‘विकेट’

## पुणे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर अपशकुन!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये स्थानिक आणि बाहेरचा (गाववाले आणि बाहेरुन शहरात स्थायिक झालेले) असे गट आहेत. त्यामध्ये माजी महापौर योगेश बहल आणि टीमचा गट (बाहेरचा) दिवंगत अजित पवार यांच्या ‘गुड बॉक्स’ मधील म्हणून ओळखला जात होता. गेल्या २५-३० वर्षात बहल यांनी राष्ट्रवादीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये निर्णायक भूमिका ठेवली. आजही योगेश बहल शहर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आहेत.**



माजी महापौर योगेश बहल आणि मंगला कदम दोघेही मातब्बर नेते आहेत. एका अर्थाने दोघेही बाहेरचे. त्यामुळे राजकीय कारकीर्दीमध्ये स्थानिकांशी त्यांचे कधीही सूर जुळले नाही. किंबहुना, स्थानिकांमध्ये फूट पाडून राजकीय यश मिळवण्याचा यशस्वी प्रयोग या दोन्ही नेत्यांनी केला. त्याबाबत अनेकदा राजकीय वर्तुळात जाहीर चर्चाही झाली. बहल-कदम यांनी राष्ट्रवादीच्या सत्ताकाळात कारकीर्द गाजवली.

योगेश बहल यांनी कायम स्थानिकांमधील मतभेदांचा फायदा करुन घेतला. राजकारणात त्यामध्ये गैर काहीच नाही. पूर्वी मंगला कदम, शेट्टी कुटुंबीय, आसवाणी कुटुंबीय आणि आता सीमा सावळे, आशा शेंडगे अशा स्थानिक विरोधकांना सोबत घेवून बहल आजही शहराच्या राजकारणात प्रभावी दिसतात. मात्र, स्थानिकांचा ‘सपोर्ट’ नसल्यामुळे केवळ नगरसेवक आणि महापालिकेतील महत्त्वाची पदे यापर्यंतच त्यांना मजल मारता आली.

काही दिवसांपूर्वी योगेश बहल यांना विधान परिषदेवर संधी मिळावी. याकरिता सीमा सावळे यांच्या नेतृत्वात शहरातील एक शिष्टमंडळ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांना भेटले. मात्र, या जागेवर इशान सिद्धीकी यांना संधी देण्यात आली. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १६ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्याचा कार्यक्रम जाहीर झाला. १८ जून रोजी मतदान होईल. या निवडणुकीत पुन्हा बहल यांना संधी मिळेल, अशी अपेक्षा असतानाच माजी महापौर मंगला कदम यांच्या एका वक्तव्याने बहलांची अक्षरश: राजकीय “विकेट” घेतली.

### मंगला कदम सत्य बोलून गेल्या

प्रभाग क्रमांक ११ मधील उद्यान आरक्षणावर सुरू असलेल्या समाजमंदिराच्या कामावरून वाद निर्माण झाला आहे. भाजपाच्या नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी या कामाला विरोध केल्यानंतर मंगला कदम यांनी थेट आमदार महेश लांडगे यांना जाब विचारला. यावेळी त्यांनी “विलास लांडे यांना पाडण्यासाठी १५ वर्षे तुमचे काम केले,” असे वक्तव्य केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. सोशल मीडियावर आता कदम यांनी दीर्घकाळ पक्षविरोधी काम केले का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### नाना काटे, विलास लांडे ‘डार्क हॉर्स’


पुणे स्थानिक स्वराज्य विधान परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून, या जागेवर शहरातील नेत्याला संधी देऊन २०२९ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष मजबूत करण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे. बहल आणि कदम यांनी पक्षातील प्रतिस्पर्धांचा बंदोबस्त करण्यासाठी विरोधी पक्षातील उमेदवारांना साथ दिली. त्यामुळे पक्षाचे मोठे नुकसान झाले. बहल आणि कदम यांच्यावर विरोधी उमेदवारांना मदत केल्याचा आरोप असून, मंगला कदम यांच्या विधानानंतर त्यांची संधी कमी झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे विठ्ठल उर्फ नाना काटे आणि माजी आमदार विलास लांडे यांचे पारडे सध्या जड मानले जात आहे.

# मोशी जलतरण तलावात 11 वर्षीय मुलीचा पाय जाळीत अडकला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**यमुनानगर येथील मीनाताई ठाकरे जलतरण तलावात एक धक्कादायक आणि तितकीच चिंताजनक घटना समोर आली आहे. येथे पोहण्यासाठी आलेल्या अर्णवी दारफळे या 11 वर्षीय मुलीचा पाय घसरून तलावाच्या बाजूला असलेल्या सिमेंटच्या चेंबरच्या जाळीत अडकला. चिमुरडीस असह्य वेदना झाल्या. ती जोरजोरात रडू लागली. या घटनेमुळे येथील नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त केला आहे.**





### आत्तापर्यंत चारवेळा घडल्या घटना


तलावाच्या सुरक्षेबाबतचा हा पहिलाच प्रकार नसून, आतापर्यंत अशा स्वरूपाच्या चार घटना येथे घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वारंवार घडणाऱ्या या प्रकारांमुळे लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जलतरण तलावाच्या बाजूला असलेल्या सिमेंटच्या जाळीमधील किंवा चेंबरमधील गॅप जास्त असल्यामुळेच लहान मुलांचे पाय त्यात अडकत आहेत. तलाव प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन सुरक्षाव्यवस्थेचे पुनरावलोकन करणे आवश्यक असल्याची मागणी पालकांकडून होत आहे.

अखेर उपस्थित नागरिक आणि कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नानंतर तब्बल अर्ध्या तासाने या मुलीचा पाय बाहेर काढण्यात यश आले. मात्र, या दुर्लक्षामुळे सर्व पालकांनी तीव संताप व्यक्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, अर्णवी जलतरण तलावाच्या काठावर असताना अचानक तिचा पाय घसरला आणि तो थेट सिमेंटच्या जाळीच्या फटीत गेला.

पाय इतका घट्ट अडकला होता की तो सहज काढणे अशक्य झाले होते. शेवटी छनी आणि हातोड्याच्या साहाय्याने ती सिमेंटची जाळी अत्यंत काळजीपूर्वक तोडण्यात आली आणि त्यानंतरच मुलीचा पाय सुखरूप बाहेर काढता आला. या संपूर्ण प्रकारात मुलीच्या पायाला दुखापत झाली असून, तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत.

त्यामुळे हा गॅप तातडीने कमी करावा किंवा मुलांचे पाय अडकणार नाहीत अशा पद्धतीची सुरक्षित पर्यायी व्यवस्था तिथे करावी, अशी आग्राही मागणी आता संतप्त पालकांकडून केली जात आहे. कोणत्याही मोठ्या दुर्घटनेपूर्वी प्रशासनाने जागे व्हावे, असा सूर पालकांमध्ये आहे.

या घटनेनंतर जलतरण तलाव परिसरातील सुरक्षेच्या उपाययोजनांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अनेक पालकांनी संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त केला. लहान मुलांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या मानकांचे पालन झाले का, याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिसरात तत्काळ सुरक्षा तपासणी मोहीम राबवून धोकादायक ठिकाणांची दुरुस्ती करावी, अशीही मागणी होत आहे. काही पालकांनी याआधीही अशा धोकादायक फटींबाबत तक्रारी केल्याचा दावा केला आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी जलतरण तलाव परिसरात अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी तैनात करावेत, अशी मागणीही पुढे येत आहे. या घटनेमुळे परिसरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आपल्या मुलांच्या सुरक्षेबाबत त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या प्रकारानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. दोषींवर कारवाई करून सुरक्षेच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in